# 31 जानेवारी

## आजचा सुविचार :

“वेळेचा सदुपयोग करावा”

## आजचे पंचांग :

वार – सोमवार मास - पौष नक्षत्र – उत्तराषाढा

सूर्योदय – सकाळी 7.02 वाजता सूर्यास्त – सायंकाळी 6.29 वाजता

## आजचे दिनविशेष :

1. 1896: कन्नड महाकवी द. रा. बेंद्रे यांचा जन्म.

2. 1950: राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे संसदेपुढे पहिले भाषण.

3. 1920 : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक या साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध केला.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Root – मूळ 2) Trunk - खोड 3) Leaf – पान 4) Flower – फूल 5) Fruit – फळ

## आजची प्रश्नमंजुषा :

1) रस्त्यावरून आपण नेहमी कोणत्या बाजूने चालावे? 2) “नाचता येईना अंगण वाकडे” या म्हणीचा अर्थ काय?

3) दिवसातील सर्वात जास्त तापमान कोणत्या वेळी असेल? 4) झाडांची पाने का झडतात?

## बोधकथा :

### अति तेथे माती

एक भिकारी होता. तो रोज गावात लोकांना भीक मागायचा. मिळेल ते खायचा. काही मिळाले नाही, तर पाणी पिऊन जगायचा. त्याला या जीवनाचा कंटाळा आला होता. त्याला कोणीतरी सांगितले की ‘तू गावाबाहेर नदीकाठी इंद्राची पूजा कर. तो प्रसन्न होईल आणि तुला श्रीमंत करेल’. तो त्याप्रमाणे करतो. इंद्र प्रसन्न होतो.

इंद्र त्याला म्हणतो, की ‘तू तुझी झोळी पुढे कर. मी त्यात पैसे टाकत जाईत. तू जेव्हा थांब म्हणशील, तेव्हा मी थांबेन. मात्र, हे लक्षात ठेव, जर तुझी झोळी फाटली व पैसे खाली पडले तर त्यांची माती होईल. तो भिकारी आपल्या झोळीत मावेल एवढेच पैसे घेतो व त्याला थांब म्हणतो. तेवढ्या पैशांवर तो आनंदीत होतो. त्यानंतर तो गावात येतो. चांगले कपडे घेतो, घर बांधतो.

त्याला एक जण विचारतो की तू एकदम कसा श्रीमंत झालास ? तेव्हा तो त्याला सगळी हकीकत सांगतो. त्या माणसालाही पैशांची हाव सुटते. तो सुध्दा गावाबाहेर जातो. इंद्राला प्रसन्न करतो. इंद्र त्याच्या झोळीत पैसे टाकायला सुरवात करतो. तो आणखी मागत राहतो. शेवटी पैशाच्या हव्यासापायी थांब म्हणायचे विसरतो. त्यामुळे त्याच्या झोळीवर त्या पैशांचा ताण पडतो आणि ती फाटते. सर्व पैसे खाली पडतात व त्यांची माती होते. त्याचबरोबर इंद्रही नाहीसा होतो. त्याच्यापाशी रडण्याशिवाय काहीच उरत नाही.

**तात्पर्य:** कोणत्याही गोष्टीचा लोभ नसावा.